**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार, दिनांक २० ऑगस्ट २०२४**

**ठळक बातम्या**

- **डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी राष्ट्रीय शीघ्र कृती दल स्थापन करण्याचे सर्वोच्च न्यायालयाने दिले निर्देश.**
- **समांतर भरतीसाठीची जाहिरात रद्द करण्याची केंद्रसरकारची संघ लोकसेवा आयोगाला विनंती.**
- **बदलापूरच्या शाळेत विद्यार्थिनीच्या लैंगिक अत्याचार प्रकरणी बदलापूर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक आणि हेडकॉन्स्टेबल तत्काळ निलंबित, जलदगती न्यायालयात खटला चालवणार - गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आश्वासन.**
- **२४ ऑगस्ट रोजी यवतमाळात नारीशक्ती अभियानांतर्गत लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांशी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री संवाद साधणार.**
- **शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्यांकडे सरकारचं लक्ष वेधण्यासाठी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांची आक्रमक आंदोलनाची घोषणा.**

****

**कोलकाता प्रकरण**

डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी राष्ट्रीय शीघ्र कृती दल स्थापन करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत. या शीघ्र कृती दलात १४ सदस्यांचा समावेश असणार आहे. कोलकात्यातल्या महिला डॉक्टरवर बलात्कार आणि हत्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयानं स्वत: दखल घेत, आज त्यावर सरन्यायाधीश न्यायमूर्ती डॉ.धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय पीठासमोर सुनावणी घेण्यात आली. याप्रकरणी राष्ट्रीय कृती दलला तीन आठवड्यांच्या आत तपासणीचा अंतिम अहवाल सादर करण्याची सूचना न्यायालयानं केली. याबाबतची पुढील सुनावणी येत्या २२ ऑगस्टला होणार आहे. दरम्यान, सर्व केंद्र सरकारी रुग्णालयांमध्ये सुरक्षा व्यवस्थेत २५ टक्क्यांनी वाढ करण्यास केंद्र सरकारनं मान्यता दिली आहे. या घटनेनंतर राज्यातल्या निवासी डॉक्टरांच्या बेमुदत संपाचा आज आठवा दिवस आहे. सर्व सरकारी वैद्यकीय महाविद्यालयं आणि रुग्णालयं 'सुरक्षित झोन' घोषित करावीत आणि केंद्रीय आरोग्य सेवा संरक्षण कायदा लागू करावा, या मागणीवर निवासी डॉक्टर ठाम आहेत.

**समांतर भरती**

केंद्रीय लोकसेवा आयोगानं जाहीर केलेली विविध पदांवरची समांतर भरतीची जाहिरात रद्द करावी अशी विनंती केंद्रीय मंत्री डॉ.जितेंद्र सिंह यांनी लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष प्रीती सुदन यांना केली आहे. २०१४ पूर्वी अनेक पदांवर अशाच प्रकारे भरती करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर पक्षपात झाल्याचे आरोप झाले होते. पद भरतीची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीनं आणि राज्यघटनेनं नमूद केलेल्या समानता आणि सामाजिक न्यायाच्या तत्वांशी सुसंगत असणं आवश्यक आहे. उपेक्षित समाजातल्या पात्र उमेदवारांना सरकारी सेवांमध्ये त्यांचे योग्य प्रतिनिधित्व मिळावं यासाठी आरक्षणाची तरतूद आहे. मात्र समांतर पदभरतीत आरक्षणाची तरतूद नाही. त्यामुळ लोकसेवा आयोगानं १७ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केलेली जाहिरात रद्द करावी अशी विनंती सिंह यांनी पत्राद्वारे केली आहे. दरम्यान, केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनि  वैष्णव यांनी यासंदर्भात नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांपुढे प्रतिक्रीया व्यक्त केली आहे.

आज माननीय प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी जी ने बाबासाहेब अंबेडकर के संविधान के प्रति प्रतिबद्धता को एक बार फीर बहुतही  महत्वपूर्ण निर्णय के साथ बताया है दिखाया है । यूपीएससी में लैटरल एंट्री एक बहुत ही ट्रांसपेरेंट मेथड जो लिया था । उसमें रिजर्वेशन के प्रिंसिपल लगे ऐसा निर्णय लिया है। प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी जी ने हमेशा सामाजिक न्याय के प्रति अपनी प्रतिबद्धता दिखाई है।

बदलापूर

ठाणे जिल्ह्यात बदलापूरमधील आदर्श महाविद्यालयात दोन विद्यार्थिनीच्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर संतप्त पालकांनी आज सकाळी बदलापूर रेल्वे स्थानकात रेल रोको आंदोलन केलं. पालकांनी आदर्श महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारा जवळही आंदोलन केलं. रेल्वे स्थानकात चोख पोलीस बंदोबस्त तैनात असून, पालकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला जात असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. या प्रकरणी आरोपीला कडक शासन करण्यात येईल, असं सांगत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवण्याचे निर्देश दिले. अशा प्रकरणात प्रसंगी संस्थाचालकांवर देखील कारवाई करण्यात येईल असा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला. सर्व शाळांमध्ये सावित्री समित्या स्थापन झाल्या आहेत किंवा नाही ते तपासण्याचे निर्देशही

मुख्यमंत्र्यांनी दिलेत. दरम्यान, बदलापूरच्या घटनेत प्रारंभीच्या काळात कारवाईत विलंब करणारे बदलापूर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक आणि हेडकॉन्स्टेबल यांना तत्काळ निलंबित करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाणे पोलिस आयुक्तांना दिले आहेत.

***बदलापूर की घटना हुई है वह बहुत ही गंभीर है / वहा पर जिस प्रकार से उन बच्चो के साथ वाहाके एक सफाईकर्मीने एक प्रकारसे कुकर्म करने का प्रयास किया है कुकर्म किया है / यह बहुत गंभीर इस प्रकार कि बात है और इसकी हम बहुत ज्यादा निंदा करते है और राज्य सरकारने इस मामले मे एक एसआयटी का निर्माण किया है आयजी लेवल की महिला अधिकारी को एस आय टी का प्रमुख बनाया गया है हमारा यह प्रयास है कि इस मामले की तुरंत जांच होकर चार्जशीट और फास्टट्रॅक कोर्ट में इसको हम चलाने की कोशिश करेंगे ताकी जो पिडिताए उनको एक प्रकार से उसमे न्याय मिल पाये एस प्रकार का हमारा प्रयास होगा ।***

एकीकडे सरकार लाडकी बहीण योजनेचा उदोउदो करत असताना विद्यार्थ्यांचे संरक्षण सरकार करू शकत नाही. उरण, बेलापूर, मीरा-भाईंदरसारख्या घटना ताज्या असताना शाळेत अशी घटना घडणे हे निषेधार्ह आहे. या गुन्हेगारांना कठोर शिक्षा करावी अशी मागणी, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली तर बदलापुरात लहान मुलींवर जो प्रसंग ओढावला, तो अतिशय संतापजनक असून, त्याचा आपण निषेध करत आहे असं राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या, एक्स या समाजमाध्यमावरील खात्यावर पोस्टमध्ये म्हटलं असून गृह खात्यावर ताशेरे ओढले आहे. राज्यात लाडकी बहिण योजना आणता मात्र या बहिणींच्या मुली आज असुरक्षित आहेत, त्यांच्यावर अत्याचार होत आहेत. असं उद्धव ठाकरे म्हणाले. आम्ही आमच्या सरकारमध्ये शक्ती कायदा आणण्यासाठी मसुदा तयार केला आहे. या सरकारनं ते बिल मंजूर करून शक्ती कायद्याची शक्ती दाखवून द्यावी, असं आवाहन शिवसेना देखील त्यांनी केलं. बदलापूर अत्याचार प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर ते माध्यमांशी बोलत होते.दरम्यान, मंत्री गिरीश महाजन यांनी बदलापूरला रेल्वे स्थानकावर जाऊन आंदोलनकर्त्यासोबत संवाद साधला असता, त्यांना आंदोलकांनि आरोपीला फाशी देण्याची विनंती केली असून, पोलिसांची अतिरिक्त कुमक याठिकाणी मागविण्यात आली आहे. या ठिकाणी रेल्वे दुसऱ्या मार्गानं वळविण्यात आल्या आहे. पोलीस कायम आंदोलकांना चर्चेसाठी येण्याचं आवाहन करण्यात येत आहे.

**विशाखा समिती-केसरकर**

बदलापूर इथल्या शाळेत चिमुरड्या मुलीवरील अत्याचाराची घटना धक्कादायक असून, मुलींच्या सुरक्षेसाठी राज्यातील सर्व शाळांमध्ये विशाखा समित्या स्थापन करणं बंधनकारक करण्याचे आदेश आजच जारी करण्यात येणार असल्याचं शालेय शिक्षण मंत्री, दीपक केसरकर यांनी सांगितलं. बदलापूर इथल्या अत्याचाराची घटना उघडकीस आल्यानंतर मंत्रालयात शिक्षण विभागाची तातडीची बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना मंत्री केसरकर यांनी शाळांमध्येही विशाखा समित्या स्थापन करण्याचे आदेश काढण्यात येणार असल्याचं सांगितलं. मुलींच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी ई-बाक्ससोबतच तक्रार पेटी बंधनकारक करण्यात येतील असंही मंत्री, केसरकरांनी यांनी सांगितलं.

**नारीशक्ती**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्री येत्या शनिवार, २४ ऑगस्ट रोजी यवतमाळात नारीशक्ती अभियानांतर्गत लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. कीन्ही शिवारात आयोजित महिला मेळाव्याला 35 हजार महिलांची उपस्थितीती राहील, त्यादृष्टीनं नियोजन प्रशासनाकडून केल्या जात आहे. तसंच आयोजनासाठी संबंधित सर्व विभाग प्रमुखांची बैठक जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी घेतली असून कार्यक्रमस्थळाची पाहणी देखील पोलीस आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून करण्यात आली.

**तुपकर पत्रपरिषद**

शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्यांकडे सरकारचं लक्ष वेधण्यासाठी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आक्रमक आंदोलनाची घोषणा केली आहे. शेतकऱ्यांच्या मागण्यांची गांभीर्यानं दखल न घेतल्यास, २३ ऑगस्ट रोजी शेतकऱ्यांसह मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यात घुसून 'शेतकरी आत्महत्याचे प्रात्यक्षिक करून दाखवू', असा इशारा, रविकांत तुपकर यांनी नागपूर इथं झालेल्या पत्रकार परिषदेत दिला. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी तातडीनं शेतकऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात सरकारनं ठोस उपाय-योजना करणे गरजेचं आहे. सरकारनं राजकारण बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या मागण्यांवर गांभीर्यानं उपयोजना कराव्यात यासाठी आम्ही आक्रमक भूमिका घेतली असल्याचं रविकांत तुपकर यावेळी म्हणाले.

**अवकाश दिवस**

भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्था नागपूर अर्थात आय.आय.टी. नागपूर इथं येत्या 23 ऑगस्ट रोजी राष्ट्रीय अवकाश दिन साजरा करण्यात येणार असून, या अंतर्गत विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. यामध्ये 22 तारखेला सकाळी दहा पासून 23 तारखेला सकाळी दहा वाजेपर्यंत स्पेस हॅकेथॉन या स्पर्धेचा आयोजन करण्यात आलं आहे तर २३ तारखेला सकाळी 11 पासून ते दुपारी एक वाजेपर्यंत विविध अवकाशीय मॉडेल्सचे प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. याशिवाय 23 तारखेलाच अकरा वाजता तज्ञ मंडळी अवकाश संबंधीत विषयांवर संबोधित करणार आहे. स्थानिक प्रो.राजेंद्र सिंग सायन्स एक्सप्लोरेटरी तर्फे शुक्रवार, 23 ऑगस्ट रोजी सायंटिफिक पोस्टर मेकिंग स्पर्धा, प्रश्नमंजुषा आणि अवकाश विज्ञानावरील आभासी व्याख्यान अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

**कडकडीत बंद**

कोलकत्ता इथं डॉक्टर महिलेच्या अत्याचार झालेली घटना तसंच बांगलादेशातील हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ बुलढाणा जिल्ह्यात आज सकाळपासून कडकडीत बंद पाळण्यात येत आहे. जिल्ह्यातील तेरा ही तालुक्यात सर्व स्तरातून नागरिकांच्या वतीनं दुकाने, बाजार बंद ठेवण्यात आले असून, रस्त्यावर शुकशुकाट पाहायला मिळत आहे. जिल्ह्यातील सर्व संघटनांनी याला पाठिंबा दर्शवला असून यात अनेक राजकीय पक्ष संघटना सहभागी झाल्याचे वृत्त आहे.

**हवामान**

आजपासून 23 तारखेपर्यंत संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला असून, या दरम्यान गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. नागपुरात आज मधून ढगाळ वातावरण असल्यानं प्रचंड उकाडा जाणवत आहे.

******